# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.८/का.६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, २०१८.

प्रति,

जिल्हाधिकारी,
पुणे, जळगाव, अकोला व नागपूर.

विषय:- सार्वत्रिक निवडणुका जुलै-२०१८ साठी सुधारित निवडणूक कार्यक्रम.
(i)वानाडोंगरी न.प.च्या निवडणुकीच्या मतदान व मतमोजणीच्या दिनांकाबाबत..
(ii) वडगाव,मुक्ताईनगर,बार्शिटाकळी व पारशिवनी या ४ नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या मतमोजणीच्या दिनांकाबाबत..

संदर्भ:- १. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १५/०६/२०१८ चे पत्र व त्यासोबतचा निवडणूक कार्यक्रम.
२. जिल्हाधिकारी,नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१२/एमयुएन-१/कावि-३६७/२०१८, दिनांक ०६/०७/२०१८.
३. जिल्हाधिकारी,नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१२/एमयुएन-१/कावि-३७०/२०१८, दिनांक ०९/०७/२०१८.

महोदय,

वानाडोंगरी नगरपरिषदेमधील जागा क्र. ३-अ, ४-अ, ६-ब, ७-अ व ९-ब च्या छाननीच्यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द जिल्हा न्यायालयात दाखल झालेल्या अपिलांवर न्यायालयाने दिनांक ६/७/२०१८ व ७/७/२०१८ रोजी निर्णय देऊन अपिल फेटाळालेली आहेत. त्यामुळे या जागांवरील उमेदवारी मागे घेण्यासाठी सुधारित शेवटची मुदत दिनांक १०/७/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत असणार आहे, असे जिल्हाधिकारी,नागपूर यांनी संदर्भांकित दिनांक ९/७/२०१८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. तसेच या जागांच्या निवडणुकीसाठी मतदान व मतमोजणीचा दिनांक सुधारित करून देण्याबाबत आयोगाच्या स्तरावरून योग्य ते आदेश देण्याची विनंती करण्यात आली आहे.

२. वानाडोंगरी नगरपरिषदेमध्ये एकूण १० प्रभाग असून त्यापैकी ५ प्रभागांमधील ५ जागांच्या बाबतीत अपील दाखल झाल्यामुळे मतदानाचा दिनांक सुधारित करून देणे आवश्यक झाले आहे. ही बाब तसेच महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ मधील नियम ४(ड) मधील तरतूद लक्षात घेऊन वानाडोंगरी नगरपरिषदेतील अध्यक्ष पदाच्या थेट निवडणुकीसाठी व सर्वच प्रभागातील सदस्य पदांच्या निवडणुकीसाठी तसेच मतमोजणीसाठी पुढीलप्रमाणे सुधारित कार्यक्रम देण्यात येत आहे :-

**वानाडोंगरी नगरपरिषदेतील अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची /पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १. | मतदानाचा दिनांक | १९/०७/२०१८ (गुरुवार)<br>सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| २. | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | २०/०७/२०१८ (शुक्रवार)<br>सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ३. | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | कलम १९ आणि ५१-अ-१अ(९) मधील तरतुदीनुसार |

३. नागपूर जिल्हयातील **वानाडोंगरी** नगरपरिषदेसोबतच **वडगाव, मुक्ताईनगर, बार्शिटाकळी, पारशिवनी** या ४ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर झालेला आहे. अशा परिस्थितीत वानाडोंगरी नगरपरिषदेतील मतदारांवर वर नमूद नगरपंचायतींच्या निवडणुकीच्या निकालाचा परिणाम होऊ नये यादृष्टीने वडगाव,मुक्ताईनगर,बार्शिटाकळी,पारशिवनी या नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी दिनांक २०/०७/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून करण्यात यावी, असेही आदेशित करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

१२.०७.२०१८

( संजय सावंत )
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
४. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. विभागीय आयुक्त,पुणे,नाशिक,अमरावती व नागपूर विभाग
८. संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक
९. संबंधित मुख्याधिकारी, वडगाव,मुक्ताईनगर,बार्शीटाकळी,वानाडोंगरी व पारशिवनी नगरपरिषदा/नगरपंचायती.
१०.संचालक, शासकीय मुद्रण् व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४
११.राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१२.सहायक आयुक्त, संगणक कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१३.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१४.निवड नस्ती.